पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/ १०६७ /२०१३
दिनांक – १४ / ११ / २०१३

प्रति,

मा.......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची सभा दिनांक २०/११/२०१३ रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक २०/११/२०१३ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत -

१) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवडमहानगरपालिका, पिंपरी – १८.

मा.शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १२**

दिनांक :- २०/११/२०१३ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक २०/११/२०१३ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

अ) दिनांक ०३/१०/२०१३, १७/१०/२०१३, २१/१०/२०१३ व १२/११/२०१३ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ९)** सभावृत्तांत कायम करणे.

ब) दिनांक १७/१०/२०१३, २१/१०/२०१३ व १२/११/२०१३ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १०)** सभावृत्तांत कायम करणे.

क) दिनांक ०६/११/२०१३ व १२/११/२०१३ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ११)** सभावृत्तांत कायम करणे.

---------

**विषय क्र.१)** पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत चाकण, देहू, आळंदी, हिंजवडी, म्हाळुंगे, मोई,मारुंजी व इतर परिसराचा समावेश करणेबाबत शासनास मनपाचे अभिप्राय सादर करणेपूर्वी सर्व पदाधिकारी यांची बैठक दि.३०/०८/२०१३ रोजी मा.आयुक्त यांचे कक्षात घेण्यात आली. सदर बैठकीत मनपा हद्यीच्या उत्तरेकडील १४ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील ६ गावे मनपा हद्दीत समावेश करणेबाबत सविस्तर चर्चा करणेत आली आणि सदर हद्दवाढीचा प्रस्ताव मा.शहर सुधारणा समिती मार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर करणेबाबत चर्चा झाली तथापि सद्यस्थितीत मनपा हद्दीला लागून असलेली गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणे योग्य होईल. त्यानुसार खालील नमुद मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आळंदी, चिंबळी, कुरुळी, मोई, निघोजे, देहू, विठ्ठलनगर आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजवडी, माण, नेरे, सांगवडे ही मनपा हद्दीला लागून असलेली एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक २०/११/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.२)** पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत चाकण, देहू, आळंदी, हिंजवडी, म्हाळुंगे, मोई,मारुंजी व इतर परिसराचा समावेश करणेबाबतचा विषय मा.महापालिका सभेपुढे सादर केलेला असल्याने मा.आमदार श्री.दिलीप मोहिते यांचे दि.१०/०९/२०१३ चे पत्र व त्यासोबतची सहपत्रे त्या विषयात सादर करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक २०/११/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.३)** अ प्रभाग समिती ठराव क्र.१९२ दिनांक २३/०९/२०१३ नुसार चिखली जाधववाडी मधील गट नं.६५० ते गट नं.६८० मधून जाणारा १२ मिटर रस्ता हा नविन मंजूर आराखडयानुसार ( कलम ३७ नुसार ) न करता जुन्या वहिवाटीनुसार करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

( दिनांक २०/११/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.४)** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील किंवा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील विविध प्रयोजनासाठी असलेल्या आरक्षणाखालील जमिनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतूदीनुसार संपादित करणे आवश्यक असून त्यासाठी उक्त अधिनियमांचे कलम १२६ मधील तरतूदीनुसार संपादनाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच या संपादनासाठी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावाद्वारे भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी यांना सादर करणे आवश्यक आहे. केवळ स्थायी समितीच्या मंजूरीने जिल्हाधिकारी यांना सादर केलेले भूसंपादन प्रस्ताव वैध नसल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. असे निदेश शासनाने त्यांचेकडील पत्र क्र.टिपीएस-१८०७/५५९/प्र.क्र.६६७/०७/नवि-१३, दि.०७/०६/२००८ अन्वये दिलेले आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मौजे वाकड ता.मुळशी येथील मंजूर विकास योजनेतील मिळकती ( मौजे पिंपळे निलख शिव ते वाकड शाळा चौक - स.नं.२४२पै., २४४पै. ते २५१पै., २५७पै. ते २६३पै., २६५पै. व २६६ पै., २६९पै. ते २७२पै., २७६पै.ते २७८पै.) ४५ मी. व २४ मी. रस्ता रुंदीकरणासाठी भूसंपादन करणेबाबतचा भूसंपादन प्रस्ताव फक्त मा.स्थायी समितीचे मंजुरीने मा.जिल्हाधिकारी यांना सादर केलेला आहे. सदर ठिकाणच्या दि.२९/०१/२००८ रोजी घोषित झालेल्या निवाडयातील मिळकती सोडून सदर भूसंपादन प्रकरणातील स.नं.२७६पै. (सिसनं.२८९पै.), २७७पै. (सिसनं.२८८पै., २८७पै., २८६पै., २८५पै., २८४पै., २८३पै. व २८२पै.), स.नं.२७८पै. मिळकती आणि स.नं.२४२पै. (सिसनं.२८१पै.), स.नं.२४४पै. (सिसनं.७७३पै.), स.नं.२४७पै.

(सिसनं.८४३पै.), स.नं.२४९पै. (सिसनं.८७३पै., १९३१पै., ९१०पै.), स.नं.२५९पै. (सिसनं.१९४०पै.), स.नं.२७२पै. (७८७पै.), स.नं.२५७पै. (सिसनं.१९३०पै.),स.नं. २६०पै. (सिसनं.२७३७पै., २७३८पै.) मधील क्षेत्र दुरुस्ती असलेल्या मिळकतीचा भूसंपादन प्रक्रिया प्रस्ताव क्र.नरवि/कावि/३अ/२/९०/२००४, दि.२०/०५/२००४ भूसंपादन कायदा १८९४ चे कलम ४८ अन्वये प्रथमत: माघारी घेण्यास मान्यता देण्यात यावी.

सदरचा रस्ता हा बीआरटीएस रस्ता असून केंद्र सरकारचे जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत विकसित करणेत येत आहे. त्यामुळे मूळ विषयाप्रमाणे स.नं.२७६पै. (सिसनं.२८९पै.), २७७पै. (सिसनं.२८८पै., २८७पै., २८६पै., २८५पै., २८४पै., २८३पै. व २८२पै.), स.नं.२७८पै.या मिळकती आणि स.नं.२४२पै. (सिसनं.२८१पै.), स.नं.२४४पै. (सिसनं.७७३पै.), स.नं.२४७पै. (सिसनं.८४३पै.), स.नं.२४९पै. (सिसनं.८७३पै., १९३१पै., ९१०पै.), स.नं.२५९पै. (सिसनं.१९४०पै.), स.नं.२७२पै. (७८७पै.), स.नं.२५७पै. (सिसनं.१९३०पै.), स.नं.२६०पै. (सिसनं.२७३७पै., २७३८पै.) या मिळकतीसाठीच मौजे वाकड ता.मुळशी येथील मंजूर विकास योजनेतील मौजे पिंपळे निलख शिव ते वाकड शाळा चौक यामधील मिळकती ४५ मी. व २४ मी. रस्ता रुंदीकरणासाठी म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम १२६ मधील तरतूदीनुसार तातडीचे कलमासह भूसंपादन करणेचे प्रस्तावास नव्याने मान्यता मिळणेकरीता मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/४/कावि/ १०६७ /२०१३
दिनांक - १४/११/२०१३.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.

\\Nagersachiv4\nnn\Nagersachiv1/shsu-१३-१४\agenda12doc.